0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २६/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) पोलिस निरिक्षक, गुन्हे, मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २५/०४/२०१२ रोजीचे पत्र.

३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३१/२०१२/जा.२७३ दिनांक २७/०४/२०१२ व १६/०५/२०१२.

४) या कार्यालयाचे "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३१/२०१२/जा.२७४ दिनांक २७/०४/२०१२.

५) पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे सचिव सुनिल ज्योतीबा शिंदे यांचे दिनांक १५/०५/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

६) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अनंत आडिवरेकर यांचे दिनांक ०५/०६/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

७) सहा. पोलिस निरिक्षक, मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०७/०६/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.३१/२०१२/जा. ८३०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.

दिनांक : ०८/०९/२०१२.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २१/०४/२०१२ रोजी या कार्यालयास खात्रीलायक बातमी मिळाली की, लादीवादा कंपाऊंड, फातिमाबाई इस्टेट, फ्रेंड शाळेजवळ, एल.बी.एस. मार्ग, मुलूंड (प), मुंबई या ठिकाणी एका ट्रकमध्ये अनधिकृतरित्या मोठ्या प्रमाणात सिलेंडरची साठवणूक करुन ठेवली आहे. याबाबत खातरजमा करण्यासाठी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसमवेत उक्त ठिकाणी १८.१५ वाजता भेट दिली असता, सदर ठिकाणी मोकळ्या जागेत गॅस सिलेंडरने भरलेले दोन ट्रक व एक तीन चाकी टेम्पो उंभा असल्याचे

दिसून आले व सदर ठिकाणी लाल रंगाचे वेष परिधान केलेले तीन-चार इसम तीन चाकी टेम्पोमधून एका ट्रकमध्ये सिलेंडर भरत असल्याचे दिसून आले. सदर इसमांना पंचांसमक्ष भेटीचे कारण सांगून घटनास्थळी असलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ते पेट्रोलियम एम्प्लॉईज को ऑप सेंट्रल सर्व्हिस लि. या गॅस एजन्सीचे डिलीव्हरी बॉय असल्याचे सांगितले. तद्नंतर सदर एजन्सीचे व्यवस्थापक यांचा दुरध्वनी क्रमांक उपस्थित डिलिव्हरी बॉय यांचेकडून प्राप्त करुन घेऊन व्यवस्थापकाशी संपर्क साधून घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. काही कालावधीनंतर एक इसम नामे संदेश संभाजी खेडेकर हे घटनास्थळी उपस्थित झाले. त्यांनी सदर गॅस एजन्सीचे व्यवस्थापक असल्याचे सांगितले. तद्नंतर पंचांसमक्ष घटनास्थळी असलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत अधिक विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की, ते एजन्सीमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून व्यवस्थापक म्हणून काम करीत असून त्यांना मासिक ८०००/- रुपये इतके वेतन मिळत असून सदरची एजन्सी ही हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून मुलूंड (प) विभागाकरिता प्राधिकृत केलेले आहे. एजन्सीचे स्वत:चे गोडावून असून गॅस सिलेंडर साठवणूकीसाठी कंपनीने वडाळा येथे गोडावून दिलेले असून ते अनेक एजन्सीसाठी सामाईक असल्याचे सांगितले. कंपनीमधून भरुन आलेले गॅस सिलेंडर ट्रक त्यांची गॅस एजन्सी लादीवाला कंम्पाऊंड, फातिमाबाई इस्टेट, फ्रेंड शाळेच्या बाजुला एल.बी.एस. मार्ग, मुलूंड (प) या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत उभी करुन भरलेले घरगुती/व्यावसायीक गॅस सिलेंडर छोटे टेम्पो व सायकली मार्फत विभागात डिलीव्हरी बॉयकडे डिलीव्हरीकरिता देण्यात येतात व दिवस अखेर एजन्सी वाटप बंद झाल्यानंतर शिल्लक राहिलेले भरलेले व रिकामे घरगुती तसेच व्यावसायीक सिलेंडर घटनास्थळी बंद असलेल्या (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये सदर सिलेंडरची साठवणूक नेहमी केली जात असल्याचे सांगून त्याबाबत बंद ट्रकचे मालक अविनाश ए. अडिवडेकर यांचे बरोबर करार केला असल्याचे सांगून बंद ट्रकच्या मालकास प्रत्येक दिवसाला रुपये १०५०/- प्रमाणे भाडे देत असल्याचे सांगितले. तद्नंतर घटनास्थळी असलेल्या बंद ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मधील गॅस सिलेंडरची पंच व उपस्थित व्यवस्थापक यांचे समक्ष मोजदाद केली असता, सदर ट्रकमध्ये घरगुती वापराचे भरलेले ४५ व रिकामे १७७ तसेच व्यावसायिक वापराचे भरलेले ४५ असे एकूण २६७ सिलेंडर असल्याचे आढळून आले. त्याचप्रमाणे तेल कंपनीकडून दिनांक २१/०४/२०१२ रोजी ट्रक क्र. एमएच-०६-एसी-७०६७ मधून आलेले वितरण होऊन रिकामे असलेले घरगुती २७० व व्यासायिक ३० असे एकूण ३०० सिलेंडर भरलेला ट्रक बंद असलेल्या ट्रकच्या ठिकाणी शेजारी उभा असल्याचे आढळून आला. या व्यतिरिक्त एजन्सी मार्फत गॅस वितरणासाठी दोन तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०४-सीजी-३०६२ व एमएच-०१-एलअे-४५४७ तसेच तीन चाकी पाच सायकली वापरण्यात येत असल्याचे



0002

उपस्थित व्यवस्थापकाने सांगितले. घटनास्थळी बंद असलेला (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मधील घरगुती व व्यावसायिक असे मिळून २६७ सिलेंडरचा साठा अनधिकृतपणे विनापरवाना साठवणूक केल्याचे उपस्थित व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी सांगितले. तसेच सदर ट्रकमध्ये गॅस सिलेंडरच्या साठवणूकीबाबत पंचासमक्ष त्यांचेकडे अधिक विचारणा केली असता, कंपनीकडून कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही. तसेच साठवणूकीबाबत संबंधित प्राधिकरणाचे आवश्यक परवाने उदा. विस्फोटक परवाना व इतर परवाने घेतले नसल्याचे व्यवस्थापक यांनी सांगितले. ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये साठवणूक करण्यात येणारे गॅस सिलेंडरचा साठा बेकायदेशिररित्या एजन्सीच्या पदाधिकाऱ्याच्या निर्देशानुसार करण्यात येत असल्याचे पंचासमक्ष एजन्सीचे व्यवस्थापक यांनी अधिकाऱ्यांना सांगितले. याबाबत उपस्थित व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांचा जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला. त्याचप्रमाणे बंद ब्रेक डाऊन असलेला ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये अनधिकृतरित्या विनापरवाना साठवणूक करण्यात आलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत एरिया सेल्स ऑफिसर श्री. सावंत यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९९३०९४४९४९ वर संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी देखील सदरची साठवणूक बेकायदेशिर असून त्याबाबत सदर एजन्सीने कंपनीकडून मान्यता घेतली नसल्याचे व कंपनीने परवानगी दिली नसल्याचे सांगितले.

दरम्यानच्या काळात मुलूंड पोलिस ठाणे येथे दुरध्वनीवर संपर्क साधून घटनेची हकीगत सांगितली. तद्नंतर उपस्थित ठाणे अंमलदार श्री. गोपाळ पवार यांनी पोलिस नाईक संजय हिरायण चिढळे (क्रमांक ०८-१०२) यांना घटनास्थळी उपस्थित राहण्यासाठी रवाना केले असता, काही कालावधीत पोलिस नाईक घटनास्थळी हजर झाले. त्यांना घटनेची माहिती देण्यात येऊन जप्त मुद्देमाल त्यांच्या व पंचासमक्ष सिलबंद करण्यात येऊन कुलूपबंद करण्यात आलेल्या चावीसह ताब्यात देण्यात आला.

अशाप्रकारे पेट्रोलियम एम्प्लॉइज को. ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे पदाधिकारी व बंद ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अे. अडिवडेकर यांनी आपआपसात संगणमत करुन बेकायदेशिररित्या उपरोक्त ट्रकमध्ये गॅस सिलेंडर (घरगुती/व्यावसायिक) साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांविरुध्द, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच २) दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय अॅण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३(१) (ब) (क) आणि ३(२) ३(३) आणि ३(४) तसेच ४(२) कलम ६

तसेच क ७(१) (ब) (क) चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. एल.ए.सी. ७११/२०१२ दिनांक २२/०४/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ | १ नग | ७५,०००/- |
| २ | घरगुती वापराचे भरलेले ४५ गॅस सिलेंडर्स | ४५ नग | ७४,८८०/- |
| ३ | घरगुती वापराचे रिकामे १७७ सिलेंडर्स | १७७ नग | २,२१,२५०/- |
| ४ | व्यावसायिक वापराचे भरलेले ४५ गॅस सिलेंडर्स | ४५ नग | १,५५,२९५/- |
| | | एकूण | ५,२६,४२५/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १५/०५/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १५/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे उपाध्यक्ष मनोहर सीताराम कदम, सेक्रेटरी सुनिल ज्योतिबा शिंदे, खजीनदार किरण धरमाजी सुधानी, व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर हे उपस्थित राहिले व त्यांनी पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि.चे वाचावे क्र. ५ अन्वये संयुक्त लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलिस पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक ०५/०६/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अनंत आडिवरेकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तथापी, सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत.

पोलिस निरिक्षक, गुन्हे, मुलूंड पोलिस ठाणे यांनी वाचावे क्र. २ अन्वये सादर केलेल्या अहवालान्वये नमूद गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर ट्रकमध्ये ठेवण्यात आले असून सदर जप्त सिलेडर (रिकामे / भरलेले) मध्ये अतिज्वलनशिल पेट्रोलियम पदार्थ असून ते अशाप्रकारे असुरक्षिततरित्या ठेवणे धोकादायक आहे. तसेच मुलूंड

CONTROLLER OF RATIONING ... HEAD OF ... MUMBAI

पोलिस ठाण्यास मनुष्यबळाची कमतरता असल्याने सदर घटनास्थळी दिवस-रात्र अधिक काळ पहारा नेमणे शक्य नाही. तरी सदर गन्ह्यातील जप्त अतिज्वलनशिल पेट्रोलियम पदार्थाच्या विल्हेवाटीबाबत आदेश पारीत करण्याची विनंती केली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणी होवून सर्व संबंधितांचे म्हणणे ऐकुन घेऊन अंतीम निकालपत्र देण्यास विलंब लागणार असल्याने तसेच जप्त गॅस सिलेंडर ज्वलनशील असून, कोणतीही दुर्घटना होवू नये, सबब, मुलुंड पोलिस ठाणे यांनी केलेल्या विनंतीनुसार जप्त मुद्देमालाबाबत वाचावे क्र. ४ अन्वये अंतरीम आदेश पारित करण्यात आले.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक १५/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे उपाध्यक्ष मनोहर सीताराम कदम, सेक्रेटरी सुनिल ज्योतिबा शिंदे, खजीनदार किरण धरमाजी सुधानी, व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी युक्तीवाद केला की, पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. सदर संस्था ही पूर्वी धी नॅचरल गॅस कंपनी सन १९८१ साली कमी केलेल्या कामगारांनी धी नॅचरल गॅस व हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांच्या विरोधात सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार स्थापन केलेली कामगार संस्था आहे. त्यानंतर हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (एच.पी.सी.एल.) कंपनीची सदर संस्था मान्यता प्राप्त गॅस वितरक झाली आहे. त्यामुळे कामगारांचे पुनर्वसन झाले आहे. त्यांच्या संस्थेला एच.पी.सी.एल. च्या वतीने ३६/३५८, बी.पी.टी. हॉस्पीटल समोर, नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व) येथे अनेक वितरक मिळून मोठे गोदाम दिलेले आहे. एच.पी.सी.एल. लि. माहूल चेंबूर येथून गॅस भरलेले सिलेंडर घेऊन येणारा ट्रक जर वडाळा गोदामात खाली करुन गेला तर तेथून मुलूंड (प) त्यांच्या एजन्सीसाठी दुसऱ्या ट्रकने भरुन एवढ्या ट्रॅफिकमधून घेऊन येणे म्हणजे वेळ व खर्च वाया जाणे त्यामुळे मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर वेळेवर मिळणे कठीण जाते. अशा परिस्थितीमुळे वितरण बिले बाकी राहतात व ग्राहकांना उत्तर देणे (सामोरे जाणे) त्रासदायक होते. म्हणून मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर घरपोच लवकर मिळावा यासाठी एच.पी.सी.एल. माहुल चेंबूर येथून गॅस सिलेंडर भरलेला ट्रक एच.पी.सी.एल. च्या परवानगीने संस्था मुलूंड (प) एजन्सीसाठी परस्पर घेते व वितरण करते. त्यासाठी रिकाम्या सिलेंडरची पर्यायी/तात्पुरती व्यवस्था म्हणून ट्रकमध्ये (क्र. एमएच-१८-एम-३०३८) केलेली होती. सदर ट्रकमध्ये रिकामी सिलेंडर असतात. परंतू आपल्या कार्यालयाचे फिरत्या पथकाचे अधिकारी/कर्मचारी त्या ठिकाणी आले. तेव्हा एच.पी.सी.एल. कंपनीकडून गॅस भरलेला सिलेंडरचा ट्रक आलेला होता व वितरणही चालू होते.

त्यामुळे आपल्या अधिकाऱ्यांना जागेवर भरलेल्या सिलेंडरचा साठा मिळाला. आपण पत्रात नमूद केल्याप्रमाणे उदा. विस्फोटक परवाना कोणत्याही गॅस वितरकाकडे नसावा. त्यांनी गोदामासाठी मुलूंड (प) परिसरात बरेच प्रयत्न केले. परंतू गॅस सिलेंडर ठेवण्यासाठी गोदाम जरी मिळाले तरी त्यासाठी परवाना मिळत नाही व एजन्सीच्या जवळपास मिळत नाही. त्यामुळे गॅस सिलेंडर घरोघर वेळेवर वितरण करणे कठिण जाते. त्यांचा हेतू मान्यवर ग्राहकांना वेळेवर घरपोच गॅस सिलेंडर मिळावा. सदर व्यवसाय हा फायद्यापेक्षा खर्चात टाकणारा जास्त आहे. या सर्व बाबींचा विचार करावा. जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल संस्थेला परत मिळावा, अशी विनंती आहे. कारण त्यात संस्थेच्या भरलेल्या गॅस सिलेंडरची रक्कम अडली (अटकली) आहे. आजच्या स्पर्धकिय काळात सदर व्यवसाय चालविणे व संस्था टिकविणे फारच कठिण झाले आहे. या सर्व बाबी ध्यानात ठेऊन आपणच मार्ग दाखवावा व कामगार संस्था या दृष्टीने सहानुभूतीपूर्वक विचार करुन आपण संस्थेस व पदाधिकाऱ्यांना या सर्व प्रकरणातून मुक्त करावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०५/०६/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अनंत आडिवरेकर यांनी युक्तीवाद केला की, तो ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चा मालक असून सन २००८ साली त्याचे नांवे खरेदी केला आहे. त्याचा वापर माल वाहतूक करुन तो त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. त्याचे नांवे असलेला सदर ट्रक त्याने पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि., पत्ता - एशियन भवन, ७७५, टिळक रोड, दादर, मुंबई - १४ यांना दिनांक ०७/०७/२०११ पासून भाडे कराराने वापरण्यास दिला आहे. हा भाडे करार मुंबई मुक्कामी करण्यात आला आहे. त्या करारातील शर्तीनुसार त्याचा ट्रक पेट्रोलियम को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. यांना दिनांक ०७/०७/२०११ या तारखेपासून पुढील तीन वर्षासाठी रुपये १०५०/- प्रति दिन या तत्त्वावर वरील सोसायटीला दिला आहे. त्या करारानुसार त्याने कोणत्याही प्रकारच्या नियमांचे उल्लंघन केलेले नाही. तो त्याच्या जबाबदारीनुसार कोणत्याही प्रकारचे सहकार्य करण्यास तयार आहे. म्हणून कृपा करुन त्याला ह्या प्रकरणातून वगळण्यात यावे व त्याचा ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ नैसर्गिक तत्त्वानुसार त्याला परत करण्यात यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

सहाय्यक पोलिस निरिक्षक, मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०७/०६/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला मोटार ट्रक नं. एमएच-१८-एम-३०३८ हा गुन्ह्यातील जप्त मालमत्ता असल्याने सदर बाबत योग्य तो आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

CONTROLLER OF RATIONING HEAD

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २१/०४/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसमवेत लादीवादा कंपाऊंड, फातिमाबाई इस्टेट, फ्रेंड शाळेजवळ, एल.बी.एस. मार्ग, मुलूंड (प), मुंबई या ठिकाणी भेट दिली असता, सदर मोकळ्या जागेत गॅस सिलेंडरने भरलेले दोन ट्रक व एक तीन चाकी टेम्पो उभा असल्याचे तसेच लाल रंगाचे वेष परिधान केलेले तीन-चार इसम तीन चाकी टेम्पोमधून एका ट्रकमध्ये सिलेंडर भरत असल्याचे दिसून आले. त्यांचेकडे सिलेंडर बाबत चौकशी केली असता, मे. पेट्रोलियम एम्प्लॉईज को ऑप सेंट्रल सर्व्हिस लि. या गॅस एजन्सीचे असल्याचे सांगितल्याने एजन्सीचे व्यवस्थापक यांचा दुरध्वनी क्रमांक उपस्थित डिलिव्हरी बॉय यांचेकडून प्राप्त करुन घेऊन व्यवस्थापकाशी संपर्क साधून घटनास्थळी बोलावून घेण्यात आले. तद्नंतर उपस्थित झालेले व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांचेकडे घटनास्थळी असलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत अधिक विचारणा केली असता, त्यांनी असे सांगितले की, सदरची एजन्सी ही हिन्दुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून मुलुंड (प) विभागाकरिता प्राधिकृत केलेले आहे. गॅस सिलेंडर साठवणूकीसाठी कंपनीने वडाळा येथे गोडावून दिलेले असून कंपनीमधून भरुन आलेले गॅस सिलेंडर ट्रक ते लादीवाला कंम्पाऊंड, फातिमाबाई इस्टेट, फ्रेंड शाळेच्या बाजुला एल.बी.एस. मार्ग, मुलुंड (प) या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत उभी करुन भरलेले घरगुती/व्यावसायीक गॅस सिलेंडर छोटे टेम्पो व सायकली मार्फत विभागात डिलीव्हरी बॉयकडे डिलीव्हरीकरिता देण्यात येतात व दिवस अखेर एजन्सी वाटप बंद झाल्यानंतर शिल्लक राहिलेले भरलेले व रिकामे घरगुती तसेच व्यावसायीक सिलेंडर घटनास्थळी बंद असलेल्या (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये सदर सिलेंडरची साठवणूक नेहमी केली जात असल्याचे सांगून त्याबाबत बंद ट्रकचे मालक अविनाश ए. अडिवरेकर यांचे बरोबर करार करुन प्रत्येक दिवसाला रुपये १०५०/- प्रमाणे भाडे देत असल्याचे सांगितले. सदर ट्रकमध्ये गॅस सिलेंडरच्या साठवणूकीबाबत त्यांना कंपनीकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. तसेच साठवणूकीबाबत संबंधित प्राधिकरणाचे आवश्यक परवाने उदा. विस्फोटक परवाना व इतर परवाने घेतले नसल्याचे व्यवस्थापक यांनी सांगितले. घटनास्थळी बंद असलेला (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मधील घरगुती व व्यावसायिक असे मिळून २६७ सिलेंडरचा साठा अनधिकृतपणे विनापरवाना साठवणूक एजन्सीच्या पदाधिकाऱ्याच्या निर्देशानुसार केल्याचे उपस्थित व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी सांगितले. याबाबत उपस्थित व्यवस्थापक

संदेश संभाजी खेडेकर यांचा जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला. त्याचप्रमाणे बंद ब्रेक डाऊन असलेला ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये अनधिकृतरित्या विनापरवाना साठवणूक करण्यात आलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत एरिया सेल्स ऑफिसर श्री. सावंत यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९९३०९४४९४९ वर संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी देखील सदरची साठवणूक बेकायदेशिर असून त्याबाबत सदर एजन्सीने कंपनीकडून मान्यता घेतली नसल्याचे व कंपनीने परवानगी दिली नसल्याचे सांगितले.अशाप्रकारे पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे पदाधिकारी व बंद ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अे. अडिवडेकर यांनी आपआपसात संगणमत करुन बेकायदेशिररित्या उपरोक्त ट्रकमध्ये गॅस सिलेंडर (घरगुती/व्यावसायिक) साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर ट्रक व घरगुती वापराचे भरलेले ४५ व १७७ रिकामे तसेच व्यावसायीक वापराचे भरलेले ४५ गॅस सिलेंडर्सचा साठा जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे उपाध्यक्ष मनोहर सीताराम कदम, सेक्रेटरी सुनिल ज्योतिबा शिंदे, खज़ीनदार किरण धरमाजी सुधानी, व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात पेट्रोलियम एम्प्लाइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. या संस्थेला एच.पी.सी.एल. च्या वतीने १६/३५८, बी.पी.टी. हॉस्पीटल समोर, नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व) येथे अनेक वितरक मिळून मोठे गोदाम दिलेले आहे असे सांगुन एच.पी.सी.एल. लि. माहूल चेंबूर येथून गॅस भरलेले सिलेंडर घेऊन येणारा ट्रक जर वडाळा गोदामात खाली करुन गेला तर तेथून मुलूंड (प) त्यांच्या एजन्सीसाठी दुसऱ्या ट्रकने भरुन एवढ्या ट्रॅफिकमधून घेऊन येणे म्हणजे वेळ व खर्च वाया जाणे त्यामुळे मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर वेळेवर मिळणे कठीण जाते. म्हणून मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर घरपोच लवकर मिळावा यासाठी एच.पी.सी.एल. माहुल चेंबूर येथून गॅस सिलेंडर भरलेला ट्रक एच.पी.सी.एल. च्या परवानगीने संस्था मुलूंड (प) एजन्सीसाठी परस्पर घेते व वितरण करते. त्यासाठी रिकाम्या सिलेंडरची पर्यायी/तात्पुरती व्यवस्था म्हणून ट्रकमध्ये (क्र. एमएच-१८-एम-३०३८) केलेली होती असे सांगितले.

तथापी, सदर गॅस एजन्सीचे व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात ते नमुद ठिकाणी बंद असलेला (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ या ट्रकमध्ये नेहमीच सिलेंडरची सांठवणुक एजन्सीच्या पदाधिकाऱ्याच्या निर्देशानुसार करीत असल्याचे सांगितले. यावरुन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे. वास्तविक पहाता ज्या गॅस



RATIONING & DI... HEAD OFF... MUMBAI

वितरकांकडे स्वत:च्या मालकीचे अथवा भाडेतत्वावर त्यांच्या गॅस एजन्सी असलेल्या विभागात गॅस सिलेंडरच्या साठवणुकीसाठी गोदाम उपलब्ध नसल्यास संबंधित तेल कंपनी अशा गॅस वितरकांना गॅस ग्राहकांच्या सोयीसाठी कंपनीचे गोदाम करारनाम्याद्वारे उपलब्ध करुन देते. त्यानुसार मे. पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. या गॅस वितरकास कंपनीकडून गोदाम उपलब्ध करुन देऊन सुध्दा त्यांनी संबंधित तेल कंपनीची परवानगी न घेता तसेच गोदामाकरिता आवश्यक असलेले संबंधित प्राधिकरणाकडील परवाने प्राप्त करुन न घेता ते घटनास्थळी उघड्या व मोकळ्या जागेत रहदारीच्या रस्त्यावर तसेच आजुबाजूस लोकवस्ती असलेल्या परिसरात अनधिकृतरित्या साठवणूक करणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. सदर गॅस वितरकाने नियमितरित्या अनधिकृत गोदामावर साठवणूक करुन तेल कंपनीसोबत असलेल्या करारनाम्यामधील अटींचे भंग करुन त्यांनी शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची फसवणुक केल्याचे सिध्द होत आहे. मे. पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. या गॅस एजन्सीच्या पदाधिकाऱ्यांनी केलेला खुलासा व घटनास्थळी पथकाने व्यवस्थापकाचा नोंदविलेला जबाब हा एकमेकाशी विपर्यास्त असुन सदर गुन्ह्यात जप्त केलेले गॅस सिलेंडरच्या मालकीचा दावा केला असला तरी जप्त साठयाबाबत कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर न करणे ही बाब साशंकता निर्माण करणारी आहे. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला अनधिकृत गोदामामधील गॅस सिलेंडर्सचा साठा हा पुरावादर्शक कागदपत्रांअभावी अवैध साठा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत असल्याने दिनांक २०/०४/२०१२ रोजी पारीत केलेले अंतरीम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

त्याचप्रमाणे ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अनंत आडिवडेकर यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात तो ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चा मालक असून सन २००८ साली त्याचे नांवे खरेदी केला आहे. त्याचा वापर माल वाहतूक करुन तो त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. सदर ट्रक त्याने पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि., पत्ता - एशियन भवन, ७७५, टिळक रोड, दादर, मुंबई - १४ यांना दिनांक ०७/०७/२०११ पासून पुढील तीन वर्षासाठी रुपये १०५०/- प्रति दिन या तत्त्वावर भाडे कराराने वापरण्यास दिला आहे. त्याचा ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ नैसर्गिक तत्त्वानुसार त्याला परत देण्यात यावा असे सांगितले. ट्रकचे मालक व गॅस वितरक यांच्यामधील करारनाम्याचे अवलोकन करता सदर ट्रकचा करारनामा हा केवळ वाहतुकीसाठी अंमलात आला असुन नमुद गुन्हयात जप्त करण्यात आलेला ट्रक हा गेल्या काही वर्षापासुन घटनास्थळीच बंद अवस्थेत उभा असल्याने ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अनंत आडिवडेकर व मे. पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. च्या पदाधिकाऱ्यांनी संगनमत करुन खोटया

करारनाम्याद्वारे सदर ट्रकचा संबंधितांनी शासन नियंत्रित दराचे सिलेंडर अवैध साठवणुकीसाठी अनधिकृतपणे वापर केला असल्याचे सिध्द होत असल्याने या प्रकरणी ट्रकमालकाचाही सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. एल.ए.सी. ७११/२०१२ दिनांक २२/०४/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक २७/०४/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ हा हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

RATIONING & ... HEAD OFFICE MUMBAI

संदेश संभाजी खेडेकर यांचा जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला. त्याचप्रमाणे बंद ब्रेक डाऊन असलेला ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ मध्ये अनधिकृतरित्या विनापरवाना साठवणूक करण्यात आलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याबाबत एरिया सेल्स ऑफिसर श्री. सावंत यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९९३०९४४९४९ वर संपर्क साधून विचारणा केली असता, त्यांनी देखील सदरची साठवणूक बेकायदेशिर असून त्याबाबत सदर एजन्सीने कंपनीकडून मान्यता घेतली नसल्याचे व कंपनीने परवानगी दिली नसल्याचे सांगितले.अशाप्रकारे पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे पदाधिकारी व बंद ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अे. अडिवडेकर यांनी आपआपसात संगणमत करुन बेकायदेशिररित्या उपरोक्त ट्रकमध्ये गॅस सिलेंडर (घरगुती/व्यावसायिक) साठवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर ट्रक व घरगुती वापराचे भरलेले ४५ व १७७ रिकामे तसेच व्यावसायीक वापराचे भरलेले ४५ गॅस सिलेंडर्सचा साठा जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे उपाध्यक्ष मनोहर सीताराम कदम, सेक्रेटरी सुनिल ज्योतिबा शिंदे, खज़ीनदार किरण धरमाजी सुधानी, व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात पेट्रोलियम एम्प्लाइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. या संस्थेला एच.पी.सी.एल. च्या वतीने १६/३५८, बी.पी.टी. हॉस्पीटल समोर, नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व) येथे अनेक वितरक मिळून मोठे गोदाम दिलेले आहे असे सांगुन एच.पी.सी.एल. लि. माहूल चेंबूर येथून गॅस भरलेले सिलेंडर घेऊन येणारा ट्रक जर वडाळा गोदामात खाली करुन गेला तर तेथून मुलूंड (प) त्यांच्या एजन्सीसाठी दुसऱ्या ट्रकने भरुन एवढ्या ट्रॅफिकमधून घेऊन येणे म्हणजे वेळ व खर्च वाया जाणे त्यामुळे मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर वेळेवर मिळणे कठीण जाते. म्हणून मान्यवर ग्राहकांना गॅस सिलेंडर घरपोच लवकर मिळावा यासाठी एच.पी.सी.एल. माहुल चेंबूर येथून गॅस सिलेंडर भरलेला ट्रक एच.पी.सी.एल. च्या परवानगीने संस्था मुलूंड (प) एजन्सीसाठी परस्पर घेते व वितरण करते. त्यासाठी रिकाम्या सिलेंडरची पर्यायी/तात्पुरती व्यवस्था म्हणून ट्रकमध्ये (क्र. एमएच-१८-एम-३०३८) केलेली होती असे सांगितले.

तथापी, सदर गॅस एजन्सीचे व्यवस्थापक संदेश संभाजी खेडेकर यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात ते नमुद ठिकाणी बंद असलेला (ब्रेक डाऊन) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ या ट्रकमध्ये नेहमीच सिलेंडरची सांठवणुक एजन्सीच्या पदाधिकाऱ्याच्या निर्देशानुसार करीत असल्याचे सांगितले. यावरुन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे. वास्तविक पहाता ज्या गॅस

करारनाम्याद्वारे सदर ट्रकचा संबंधितांनी शासन नियंत्रित दराचे सिलेंडर अवैध साठवणुकीसाठी अनधिकृतपणे वापर केला असल्याचे सिध्द होत असल्याने या प्रकरणी ट्रकमालकाचाही सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्राप्त झालेल्या प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. एल.ए.सी. ७११/२०१२ दिनांक २२/०४/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) या कार्यालयाचे दिनांक २७/०४/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेले ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ हा हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे पदाधिकारी
२) ट्रक क्र. एमएच-१८-एम-३०३८ चे मालक अविनाश अे. अडिवडेकर
३) पेट्रोलियम एम्प्लॉइज को.ऑ. सेंट्रल सर्व्हिस सोसायटी लि. चे व्यवस्थापक, संदेश संभाजी खेडेकर
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मुलूंड पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) चिफ रिजनल मॅनेजर, मुंबई एल.पी.जी. रिजनल ऑफिस, मे. हिन्दुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., एल.यु. गडकरी मार्ग, एच.पी. रिफायनरीच्या मागे, माहुल, मुंबई-७४ (दुरध्वनी क्र. ०२२-२५५४८६७७) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0012